# फिशर आणि होमिओपॅथिक उपचार




गुद्द्वारातील बहुसंख्य आजार हे कुंथणे या प्रकाराने उद्‌भवतात. त्याचबरोबर धावपळीच्या या जीवनात लोकांना संडासासाठी पुरेसा वेळ नसतो. घाईघाईने संडास उरकणे हा त्याला पर्याय नसून या प्रक्रियेने गुद्द्वारास नक्कीच जखमा व्हायला सुरुवात होते.

गुदविदर ही सर्वसामान्यपणे लोकांमध्ये आढळून येणारी वेदनादायक आणि अवघडून टाकणारी अवस्था आहे. ऋ२४१ म्हणजे गुद्द्वाराजवळ चीर पडणे. गुद्द्वार म्हणजे शरीरातील चयापचय क्रियेनंतर तयार झालेला चोथा (मल) शरीराबाहेर टाकण्याचा मार्ग. गुद्द्वाराचा मार्ग मोठ्या आतड्याच्या शेवटच्या भागापासून सुरू होतो आणि तो २.५ ते ४ सें.मी. लांबीचा असतो. ही गुद्‌नलिका खालच्या आणि मागच्या दिशेला झुकलेली असते. हा गुद्‌मार्गाचा भाग आतल्या बाजूने अनैच्छिक परिसंकोची आणि बाहेरच्या बाजूने ऐच्छिक परिसंकोची (Sphincter) भागाने बंद करून ठेवला जातो. या मार्गाच्या वरच्या दोन तृतीयांश भागाला खालच्या एक तृतीयांश भागापेक्षा जास्त रक्तपुरवठा होतो.

शौचाला कठीण होण्यामुळे जोर दिल्यानंतर या मार्गाच्या मागच्या भागावर ताण निर्माण होतो. कारण हा मार्ग मागे झुकलेला आणि कमी रक्तपुरवठ्याचा असतो. ताणामुळे आणखीन रक्तपुरवठा कमी होतो. परिणामी गुद्द्वाराच्या मागच्या बाजूला चीर पडते आणि ती लवकर भरून येत नाही. परिणामी मलविसर्जन करताना तीव्र वेदना होतात. त्याचबरोबर आतील परिसंकोची जास्त आकुंचन पावल्यामुळे या भागातील दाब वाढतो आणि गुद्द्वाराभोवतीच्या त्वचेला कमी रक्तपुरवठा होतो. ताणामुळे गुद्द्वाराजवळील लेश्मआवरण आणि त्वचा फाटते आणि चीर पडते.

**कारणे** :- १. काही लोकांमध्ये गुदविदराचे निश्चित कारण समजून येत नाही. २. गुद्द्वारातील लेश्मआवरण कडक संडासामुळे जखम होणे, हे कारण बऱ्याच जुनाट बद्धकोष्ठतेचा त्रास असलेल्या लोकांमध्ये आढळून येते. ३. गुद्‌मार्गाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांचा अभाव हे कारण ८५ टक्के लोकांमध्ये आढळून येते. आतल्या परिसंकोची भागातून जाणाऱ्या रक्तवाहिन्या दाबल्यामुळे गुद्‌मार्गाच्या मागच्या भागाला कमी रक्तपुरवठा होऊन चिरा पडतात, ४. क्षयरोग, रक्तातील कॅन्सर, गळवे, एड्स, Crohn's disease, Ulcerative Colitis या आजारांमुळे ही तक्रार उद्‌भवू शकते. ५. शरीरसंबंधातून उद्‌भवणारे आजार जसे Syphilis, Herpes, Human Papilloma Virus इ. संसर्गजन्य आजार. ६. अनैसर्गिक शरीरसंबंध.

**धोकादायक घटक** : १. शौचाला कठीण होण्यामुळे, सतत जुलाब होण्यामुळे, गुद्द्वाराची जागा वैद्यकीय साधनांनी तपासताना, प्रसूतीवेळी गुद्द्वाराला जखमा होऊन या आजाराला सुरुवात होऊ शकते. प्रसूतीच्या वेळी बाळाच्या डोक्यामुळे या मार्गात दाब निर्माण झाल्यामुळे किंवा साधनांचा वापर केल्यामुळे असे होऊ शकते. २. तंतुमय पदार्थांचा अतिकमी प्रमाणात वापर. ३. मानसिक ताणतणावामुळे परिसंकोचातील स्नायू आकुंचन पावल्यामुळे गुद्‌नलिकेतील दबाव वाढतो.

**लक्षणे** : १. गुद्‌भागात तीव्र वेदना होणे, कापल्यासारख्या, चिरल्यासारख्या, पोळल्यासारख्या वेदना, पडसाकडला होताना किंवा झाल्यानंतर होणे, २. अधूनमधून पडसाकडला लालसर रक्तस्राव होणे, ३. गुद्द्वाराजवळचा भाग लालसर होऊन पाठीमागच्या दिशेला चीर पडणे. अशा चिरेला मलामुळे जंतुसंसर्ग होणे.

**आजार टाळण्यासाठीचे उपाय** : १. बद्धकोष्ठता हे या आजाराचे प्रमुख कारण असून चुकीच्या खाण्याच्या सवयी, व्यायामाच्या अभावामुळे उद्‌भवतो. यासाठी आहारामध्ये तंतुमय पदार्थांचे जास्तीत जास्त प्रमाणात सेवन करणे, म्हणजेच पालेभाज्यांचे, फळांचे, शेंगांच्या भाज्यांचा, कडधान्यांचा, सूरण, फळभाज्यांचा वापर करणे, भरपूर प्रमाणात पाणी प्यावे, २. पडसाकडला जोर न देणे, जुलाब झाल्यानंतर ताबडतोब उपचार करणे, गुद्‌भागात स्वच्छता बाळगणे, ३ आंघोळ झाल्यानंतर थोडा वेळ गरम पाण्यात बसणे. त्यामुळे गुद्‌मार्गातील आकुंचन कमी होण्यास मदत होते.

**केस** : ही एका ६० वर्षे वयाच्या वृद्धाची केस आहे. ज्यांना उच्च रक्तदाबाबरोबर गुदविदराचा त्रास आहे. १५ वर्षांपूर्वी गुदविदरासाठी शस्त्रक्रिया करूनही त्यांना वारंवार हाच त्रास उद्‌भवत होता आणि एकाच जागेवर १० मिनिटांपेक्षा जास्त वेळ बसता येत नव्हते. सर्वप्रकारे उपचार करूनदेखील फरक पडत नसल्यामुळे ते माझ्या दवाखान्यात आले.

**तक्रारी** : १. गुद्द्वाराजवळ वेदना होणे, ४ महिन्यांपासून गुद्द्वाराजवळ सतत टोचल्यासारख्या आणि पोळल्यासारख्या वेदना होणे, कधी कधी संडासावाटे रक्त पडणे, खूप वेळ बसल्यानंतर वेदना वाढणे, गरम पाण्याने शेकल्यावर बरे वाटणे, २. शौचाला कडक व जोर द्यावा लागतो, कधी कधी शौचाला चिकट श्लेश्मयुक्त होणे, ३. तीन महिन्यांपूर्वी डाव्या बाजूचे जांगेतील हर्नियाची शस्त्रक्रिया आणि १५ वर्षांपूर्वी गुदविदरासाठी शस्त्रक्रिया करण्यात आली होती.

**विशेष माहिती** : १. तंबाखूसेवनाची सवय, २. खाण्यात गोडाची आवड, दुधाची नावड, ३. लघवी करताना जोर द्यावा लागणे आणि पूर्ण न झाल्याची भावना, ४. थंड प्रकृती.

**स्वभाव** : तुमच्या लहानपणाविषयी माहिती सांगा. - मला ५ भाऊ व ३ बहिणी आहेत. लहानपणीचे दिवस खूप गरिबीचे असल्यामुळे मला काम करून शिकावे लागले. माझ्या वयाच्या १५ व्या वर्षी वडील वारले. त्यानंतर मला खूपच मेहनत करावी लागली. त्यामुळे माझा स्वभाव चिडखोर बनू लागला. माझ्या विरोधात कोणतीही गोष्ट मला सहन होत नसे.

तुमच्या ताणतणावाविषयी सांगा. - माझे वयाच्या २४ व्या वर्षी लग्न झाले. मला २ मुले आणि १ मुलगी आहे. पूर्वी मला राग, अन्याय बिलकूल सहन होत नसे. परंतु, आता मी राग व्यक्त करत नाही. याचे कारण म्हणजे माझ्या मुलीचा ६ वर्षांपूर्वी घटस्फोट झाला. त्या वेळेस मीच माझ्या मुलीचे लग्न जमवले होते म्हणून माझ्या बायकोने मलाच दोषी ठरवले. तिने सगळ्यांदेखत माझा अपमान केला. ही गोष्ट मला सहन झाली नाही आणि तेव्हापासून मला रक्तदाबाचा त्रास सुरू झाला. आताही माझे माझ्या बायकोशी पटत नाही. सुनेने मी सांगितलेले ऐकले नाही, मला उत्तर दिलेले मला सहन होत नाही. परंतु, मी माझा राग व्यक्त करत नाही. सध्या मला एकटंच राहायला आवडतं.

**संपूर्ण व्यक्तिमत्त्व** : १. दडपला गेलेला राग, २. अपमानित झाल्याची भावना, ३. बद्धकोष्ठतेचा त्रास व तंबाखूचे व्यसन, ४. लघवीला, शौचाला जोर द्यावा लागणे, ५. दोन शस्त्रक्रिया झालेल्याचा पूर्वइतिहास, ६. गुद्द्वाराजवळ टोचल्यासारख्या वेदना, गरम पाण्याने बरे वाटणे, ७. थंड प्रकृती.

**प्रतिसाद** : वरील माहितीच्या आधाराने मी त्यांना होमिओपॅथिक औषध सुरू केले. त्याचबरोबर खाण्यातील पथ्ये सांगितली. एका आठवड्यात रुग्ण फेरतपासणीत आला. त्या वेळेस त्यांच्या वेदना कमी झाल्या होत्या आणि पडसाकडला साफ होऊ लागली. बसण्यासाठीचा कालावधी वाढलेला होता. १ महिन्याने पुन्हा फेरतपासणीस आल्यानंतर त्यांच्या सर्व तक्रारी दूर झालेल्या होत्या.

**पत्ता - आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल ॲण्ड फिलिंग सेंटर, तपोवन रोड, पिंपरी गाव, पुणे-१७. संपर्क - ०२०-६९३३७०८०, २७४१२५४९, २७४१२१९७**

# कायमस्वरूपी अंधत्वास कारणीभूत ठरणाऱ्यास कारावास

**पुणे: प्रतिनिधी**

> विरुद्ध दिशेने ट्रिपल सिट येऊन दिली होती धडक
>
> सहा महिने कैद व २ हजार रुपये दंड

रस्त्याच्या विरुद्ध दिशेने जावून जोरदार धडक देऊन दुचाकीस्वाराच्या कायमस्वरूपी अंधत्वाला जबाबदार ठरणाऱ्या दुचाकीचालकाला सहा महिने कारावास आणि २ हजार रुपये दंडाची शिक्षा न्यायालयाने सुनावली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी जी. के. नंदनवार यांनी हा आदेश दिला आहे. दंड न दिल्यास अतिरिक्त दोन महिने कारावास भोगावा लागेल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

विनोद सुगंध वायदंडे (वय २३, रा. गणेशखिंड रस्ता) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. तसेच अमोल विलास कांबळे (वय २४, रा. कस्तुरबा वसाहत) असे अपघातात जखमी झालेल्याचे नाव आहे. या अपघातात अमोलच्या डोक्याला जबर मार लागल्याने दोन्ही डोळ्यांना कायमचे अंधत्व आले आहे. या प्रकरणी साहेबराव शंकर दानवे (वय ४२, रा. कस्तुरबा वसाहत) यांनी फिर्याद दाखल केली आहे.

सदरचा अपघात १६ मे २०१३ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास गणेशखिंड रस्ता गोलमार्केटजवळ घडला. अमोल हा रस्त्याच्या डाव्या बाजूने दुचाकीवरून जात असताना रस्त्याच्या विरुद्ध दिशेने (रॉंग साईड) तिघेजण एकाच दुचाकीवर बसून आले होते. त्या दुचाकीने जोरदार धडक देवून झालेल्या अपघातात अमोल याला कायमस्वरूपी अंधत्व आले आहे.

या प्रकरणात सहाय्यक सरकारी अभियोक्ता मिलिंद दातरंगे यांनी ७ साक्षीदार तपासले. डॉक्टर आणि प्रत्यक्षदर्शींची साक्ष यामध्ये महत्त्वाची ठरली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण सावंत, गुन्हे शाखा पो. नि. उदय शिंगाडे, पो. उप नि. आर. डी.चव्हाण यांच्या सहकार्याने के. आर. बनसोडे यांनी तपास केला. पो. कॉ. अजित फरांदे यांनी त्यांना सहाय्यक केले.

न्यायालयाने वायदंडे याला भारतीय दंड संहिता कलम २७९ (विरुद्ध दिशेने तसेच बेभान गाडी चालविणे) नुसार ३ महिने साधी कैद आणि १ हजार रुपये दंड, तर कलम ३३८ (अपघातात गंभीर जखमी करणे) नुसार सहा महिने साधी कैद आणि १ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. शिक्षा एकत्रित भोगावी लागणार आहे. दंड न भरल्यास अतिरिक्त दोन महिने कारावास भोगावा लागणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# साथीच्या आजारांत वाढ

## डबक्यातील पाण्यामुळे वेगाने फैलाव

**पुणे: प्रतिनिधी**



शहरासह उपनगराच्या भागात साथीच्या आजारांत वाढ होत असल्याचे चित्र सध्या शहरात दिसत आहे. नुकताच झालेला पाऊस आणि साचलेल्या डबक्यातील पाणी डासांच्या आणि साथाच्या आजारांचे विषाणू निर्मितीसाठी पोषक असल्याने शहरातील रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे.

शहर आणि उपनगरात गेल्या आठवड्यापासून पाऊस पडला, परिणामी ठिकठिकाणी डबकी आणि नाल्यांमध्ये पावसाचे पाणी साचून राहिले. अजुनही काही इमारतींमध्ये विहिरी आहेत. या विहिरींची साफसफाई करता येत नसल्याने त्यांच्या पाण्यावर डेंग्यूचे डास आढळून आले आहेत. स्वच्छतेच्या अभावामुळे साथीच्या आजारात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. शहरातील लहान मोठ्या रुग्णालयांमध्येही दैनंदिन तपासणी करणाऱ्या रुग्णांच्या संख्येतही वाढ झाली आहे. यामध्ये महिलांसह लहान मुलांचा समावेश आहे.

तीव्र ताप, अचानक थंडी वाजणे, डोके दुखी, सांधेदुखी, उलट्या, अंगावर पुरळ, डोळे येणे, अश प्रकारच्या आजारांचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. अशा आजारांमुळे रक्तातील प्लेटलेट्‌सचे प्रमाण कमी होण्याच्या तक्रारींमध्येही वाढ झाली आहे. प्लेटलेट्‌स कमी झाल्याने अशक्तपणा, चक्कर अशा आजारांना निमंत्रण मिळत आहे. रक्तातील प्लेटलेट्‌सचे प्रमाण साधारणतः दीड ते चार लाखांपर्यंत असते. ते कमी होऊन ५० हजार व त्यापेक्षा कमी झाल्यास ते धोकादायक ठरु शकते. यासाठी अशक्तपणा व कणकण आल्यास त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधावा.

# शहरात स्वाइन फ्लूने दोन रुग्णांचा मृत्यू

**पुणे: प्रतिनिधी**

स्वाइन फ्लूच्या दोन रुग्णांचा शहरात सोमवारी मृत्यू झाला. शहरात आतापर्यंत १२० रुग्णांचा मृत्यू झाल्याची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे कळविण्यात आली आहे.

शहर आणि परिसरात काही दिवसांपासून असलेल्या पावसाळी वातावरणामुळे कमाल तापमानाचा पारा खाली आला आहे. हे वातावरण स्वाइन फ्लूच्या 'एच१ एन१' विषाणूंसाठी पोषक आहे. त्यामुळे रुग्णांच्या संख्येत आणि ताप, सर्दी, खोकला, डोकेदुखी अशी लक्षणे असलेल्या रुग्णांची संख्या तपासणी केंद्रांवर वाढत असल्याचे निरीक्षण महापालिकेच्या आरोग्य खात्यातील अधिकाऱ्यांनी नोंदविले आहे. गेल्या दोन दिवसांत तपासणी करण्यासाठी येणाऱ्या रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. महापालिकेच्या स्वाइन फ्लू तपासणी केंद्रांवर एका दिवसामध्ये ११४४ जणांनी तपासणी केली. त्यापैकी १०६ संशयित रुग्णांना टॅमिफ्लू हे औषध दिले आहे. स्वाइन फ्लूच्या १० अत्यवस्थ रुग्णांना व्हेंटिलेटरवर ठेवून शहरातील वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. इतर ३३ रुग्णांना रुग्णालयात दाखल केले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्याच्या विविध भागांतून रुग्ण उपचारांसाठी पुण्यातील रुग्णालयांमध्ये दाखल होत आहेत. स्वाइन फ्लूची लक्षणे दिसल्यापासून त्याचा प्रभावी उपचार करण्यास उशीर झाल्याने रुग्णांची प्रकृती गंभीर होते. त्यामुळे या रोगाने मृत्युमुखी पडणाऱ्या रुग्णांची संख्या शहरात वाढत आहे. शहरात राहणाऱ्या ४३ आणि बाहेरगावाहून उपचारासाठी आलेल्या ७७ रुग्णांचा मृत्यू झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# राज्य ग्राहक आयोगाचे खंडपीठ कायमस्वरूपी व्हावे

## कन्झुमर ॲडव्होकेट्‌स असोसिएशनची पालकमंत्र्यांकडे मागणी

**पुणे: प्रतिनिधी**

> **वकिलांना पालकमंत्र्यांकडून अपेक्षा**
>
> पुण्याचे पालकमंत्री गिरीश बापट यांच्याकडे अन्न, पुरवठा आणि ग्राहक हित संरक्षण खाते आहे. ग्राहक मंच हे या खात्यांतर्गत येत असतात. त्यामुळे पालकमंत्री हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावतील, अशी अपेक्षा वकिलांना आहे.

पुण्यात राज्य ग्राहक आयोगाचे कायमस्वरूपी खंडपीठ सुरू करण्यासाठीचा विषय राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर करून घेऊन लवकरात लवकर मार्गी लावावा, अशी मागणी कन्झुमर ॲडव्होकेट्‌स असोसिएशनतर्फे निवेदनाद्वारे अन्न, पुरवठा तथा पालकमंत्री गिरीश बापट यांच्याकडे करण्यात आली आहे.

शहरात पुणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच आणि अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच अशी दोन ग्राहक मंच आहेत. पुणे जिल्हा ग्राहक मंचात पुणे शहर परिसरातील ग्राहकांना फसवणुकीविरोधात दावा दाखल करता येतो. तर अतिरिक्त जिल्हा ग्राहक मंचात पिंपरी शहर, पुणे ग्रामीण आणि खडकी, देहुरोड आणि पुणे कॅन्टोन्मेंट परिसरातील नागरिकांना दाद मागता येते. या दोन्ही मंचानी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य ग्राहक आयोगात दाद मागता येते. सहा महिन्यांपूर्वी शहरात राज्य ग्राहक आयोगाचे खंडपीठ (सर्किट बेंच) सुरू झाले आहे.

महिन्यातील दुसऱ्या आठवड्यात सोमवार ते शुक्रवार या कालावधीत येथे सर्किट बेंच असते. नवीन तक्रारी, रिव्हिजन, अपील आणि रिव्हिजन पिटीशयन मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. दाखल आणि प्रलंबित तक्रार पाहता येथे एक न्यायिक सदस्य, दोन गैरन्यायिक सदस्य, इतर १४ कर्मचारी अशी एकूण १७ पदे निर्माण करणे गरजेचे आहे. याबरोबरच फर्निचर, टेबल, खुर्च्या, कपाटे, मंचासाठी डायस अशा विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. यासाठी निधीची आवश्यकता आहे. निधी उपलब्ध करून देण्याबरोबरच राज्य ग्राहक आयोगाचे कायमस्वरूपी खंडपीठ येथे व्हावे, यासाठी प्रयत्न करावेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा विषय मांडुन मार्गी लावावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली असल्याचे कन्झुमर ॲडव्होकेट्‌स असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. संजय गायकवाड यांनी सांगितले.

# दुरांतो एक्स्प्रेसचे बुकिंग आजपासून सुरू

**पुणे: प्रतिनिधी**

दुरांतो गाड्यांच्या प्रवासी थांब्यांमध्ये येत्या एक जानेवारीपासून करण्यात आलेल्या बदलांनुसार तिकीट बुकिंगचा मार्ग मोकळा झाला आहे. या गाड्यांचे बुकिंग येत्या मंगळवारपासून करता येणार आहे. रेल्वेच्या सिस्टिममध्ये नवीन बदलांची माहिती अपडेट करण्यात आली नव्हती, त्यामुळे जानेवारी महिन्यातील तिकीट बुकिंग करताना अनेक अडथळे येत होते.

पुण्यावरून सुटणाऱ्या दिल्ली, अहमदाबाद आणि हावडा येथे जाणाऱ्या दुरांतो एक्स्प्रेसला विविध ठिकाणी नवीन थांबे देण्यात आले आहेत, तर लोकमान्य टिळक टर्मिनस-सिकंदराबाद दुरांतो एक्स्प्रेस या गाडीला पुणे थांबा देण्यात आला आहे. पूर्वी या गाड्या काही मोजक्या स्टेशनवरच थांबून थेट जात होत्या. त्यामुळे आता नवीन स्टेशनवर थांबणार असल्याने त्यानुसार तिकिटाची फेररचना करणे गरजेचे होते. ती आता करण्यात आली असून, प्रवाशांना तिकीट बुकिंगसाठी करावी लागलेली प्रतीक्षा आता संपुष्टात आली आहे.

राज्यात विविध ठिकाणी धावणाऱ्या दुरांतो एक्स्प्रेस गाड्यांना येत्या एक जानेवारीपासून नवीन प्रवासी थांबे देण्यात आले आहेत. रेल्वे विभागाने नुकतीच त्याची घोषणा केली. त्यामुळे या गाड्यांच्या तिकिटाबाबत अनेक बदल करणे अपरिहार्य होते.

छोटे अंग निराश का



अंगाचा आकार आणि सेक्स पावरमध्ये वाढ शक्य

जर आपल्या अंगामध्ये लहानपणा, पातळपणा वा वाकडेपणा आला असेल तर आमच्या आयुर्वेदिक औषधीद्वारे अंगाला मनासारखा आकार लांब, मोठे, सुडौल बनवा. मनासारखा सेक्स टाईम वाढवून, नामर्दी, शीघ्रपतन, स्वप्नदोष, पुत्रहीनता, निलशुक्राणूस मुळापासून समाप्त करा.

३० दिवसाच्या औषधीसोबत ८ जीबी मेमरी कार्ड तसेच डीव्हीडी मोफत.

सांई अमृत

09873511231
09873381237




गुडघेदुखी

उठतांना व चालतांना गुडघे दुखणे, गुडघ्यामागील नसां टाईट वाटणे, थोडे अंतर चालले तर पायात मुंग्या येणे व बसावे लागणे, वाकुन काम न करता येणे, नसावर नस चढणे, सकाळी शरीर जखडणे इत्यादी नसांचे आजार

अदभुत बोन थेरेपी




आजचे युग प्रचंड धावपळीचे व ताणतणावचे आहे. या धावपळीच्या जीवनात पाठीचे मणके सरकतात नि सायटिका नावाचा जीवघेणा आजार जडतो. गुडघेदुखीने माणुस जणूकाही पांगळा होतो. कंबरदुखीने, खांदादुखीने (फ्रोझन शोल्डर) माणुस बेजार होतो. मग त्याचे अनेक डॉक्टरांकडे जाणे सुरु होते, हजारों रुपये खर्च होतात. प्रसंगी ऑपरेशनचा सल्ला ऐकुन सुध्दा मोकळा होतो. तरी पण गुण येत नाही.

बंधु भगिनीनों, घाबरु नका ! ऑपेशन शिवाय आम्ही हांडांचे नसांचे सर्व आजार बरे करतो. केवळ आमच्या हाताची जादु. हाताने सरकलेले मणके नीट बसवतो, फ्रोझोन शोल्डरच्या दबलेल्या नसा मोकळया करतो व गुडध्यांचे ल्युब्रीकेशन वाढवतो. केवळ पाच मिनिटात! वरील दुखणे परत परत होऊ नये म्हणुन एक इंजेक्शन दिले जाते. या इंजेक्शनचे कोणतेही साईड इफेक्ट नाहीत. एकदा आवश्य भेट घ्या व अनुभव घ्या आणि वेदनामुक्त जगा.

तपासणी फी ३०० रु. व इंजेक्शनचा खर्च ४०००/-रु. पर्यंत येतो.
जुने रिपोर्ट, एम.आर.आय., एक्स-रे सोबत घेऊन येणे.

पेन केअर सेंटर

अत्याधुनिक अल्टरनेटीव्ह, हायटेक उपचार
बोटॉक्स थेरेपी, जाईंट ल्युब्रीकेशन थेरेपी

पुणे - जंगली महाराज रोड, हॉटेल शुभमच्या पाठीमागे, दुर्गाशंकर बिल्डींग
(कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे) महिन्यातुन अल्टरनेट दोन रविवार
सकाळी ८ ते ३ मो. 9420808990, 9403354523, 9822899660

विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी

३० वर्ष अनुभवी एम.बी.बी.एस. सेक्स तज्ञांचा सल्ला



हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, शिथिलता, हायपोगोनॅडिझममुळे लहान लिंग, मधुमेहामुळे आलेली लैगिंक शिथीलता

ऑलीगोस्पर्मीया : विर्यामध्ये शुक्रजंतुची संख्या कमी असणे.
अॅझुस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.

अशा प्रकारच्या समस्या असलेली रुग्ण विनाकारण काळजी करतात व घाबरुन जाऊन मानसिक संतुलन बिघडुन भोंदु डॉक्टरांच्या जाळयामध्ये अडकतात. आपला आजार खुपच गंभीर आहे. गुप्त आहे असा समज करुन जीवनामध्ये खुपच नैराश्य ओढुन घेतात. इथेच भोंदु डॉक्टर, तुमचा फायदा उचलून तुम्हाला अधिकच घाबरवून तुमच्याकडून हजारो, लाखो रुपये उकळत असतात. बऱ्याच वेळा या डॉक्टरांना लैंगिकविषयी ज्ञान पण नसते, पण हा प्रकार संपुर्ण थांबला पाहिजे. गुप्तरोग म्हणजे महागडा उपचार हा गैरसमज काढुन टाकला पाहिजे. या उद्देशानी आशाकिरण क्लिनीकची स्थापना केलेली आहे.

आजच फोन करुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन मिळवा.

आशाकिरण क्लिनीक

गुलाब पॅव्हेलीयन, दुसरा मजला,डेक्कन बस स्टॉपच्या मागे, डेक्कन, पुणे. वेळ - ११ ते ६ पर्यंत.

7875451644, 8657122333

पोस्टाने किंवा कोरियरव्दारा औषधीसाठी. संपर्क - 7769856821